RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ०२ | सोमवार दि.१३ जानेवारी २०२५ Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -02 | MONDAY DT.13 JANUARY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES




बीड : शहरातील राजमाता जिजाऊ उद्यान येथे जयंतीनिमित्त 'तुम्ही-आम्ही बीडकर' आयोजित जिजाऊ मानवंदनेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर हे उपस्थित होते. याप्रसंगी राजमाता जिजाऊंच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाल्मिक कराडला मोक्का लावा अन्यथा सामूहिक आत्मदहन करणार

## मस्साजोग ग्रामस्थांचा इशारा, धनंजय देशमुखही टॉवरवर चढून आंदोलन करणार

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनजंय देशमुख हे सोमवारी टॉवरवर चढून आंदोलन करणार आहेत. तर मस्साजोगच्या गावकऱ्यांनी मंगळवारी सामूहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला आरोपी करावे आणि त्यालाही मोक्का लावण्यात यावा यासाठी धनंजय देशमुख आणि गावकरी हे पाऊल उचलणार आहेत.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी तपासाची माहिती देशमुख कुटुंबीयांना दिली जात नाही. खंडणीप्रकरणी आरोपी असलेल्या वाल्मिक कराडला संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी केलं जात नाही. या प्रकरणातील इतर आरोपींना मोक्का लावण्यात आला. पण त्याला मोक्का लावण्यात येत नाही अशी तक्रार मस्साजोगच्या ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे वाल्मिक कराडला मोक्का लावा या मागणीसाठी गावकरी बुधवारी दिवशी सकाळी १० वाजता सामूहिक आत्मदहन आंदोलन करणार आहेत.

संतोष देशमुख यांचा भाऊ धनंजय देशमुख यांनी सोमवारी टॉवरवर चढून आंदोलन करणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर मस्साजोगचे गावकरी हे एकत्रित जमले आणि त्यांनी बुधवारी सामूहिक आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला.

बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या

(उर्वरीत पान २ वर)





### वाल्मिक कराडवर मोक्का का लावत नाही?

खंडणी प्रकरणी कोठडीत असलेल्या वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी अशी धनंजय देशमुखांची मागणी आहे. वाल्मिक कराडवर हत्येप्रकरणी कारवाई का केली नाही? असा सवाल त्यांनी सरकारला विचारला आहे. धनंजय देशमुखांसह मस्साजोगचे ग्रामस्थही मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन करणार आहेत.




घनसावंगी - तालुक्यातील घोन्सी तांडा येथे वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने पिकांसह सौरऊर्जा पाट्याना देखील फटका बसला आहे घोंनसी तांडा न १ येथील पुंजाराम परसराम राठोड यांच्या गट न १९ मधील सौरऊर्जा पंप पाट्याचे नुकसान झाले असुन सबंधित सौरऊर्जा कंपनीने पाहणी करून या पाट्या दुरस्ती करून मागणी त्यांच्या कडून केली जात आहे.

## संत भगवानबाबांची ५९ वी पुण्यतिथी १४ जानेवारीला

बीड :प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत वै. ह.भ.प. श्री भगवानबाबा यांची ५९ वी पुण्यतिथी यावर्षी मंगळवार दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होणार आहे. याविषयी माहिती अशी की बीड आणि अहिल्यानगरच्या सीमेवर असलेल्या श्रीक्षेत्र भगवानगडाचे संस्थापक आणि पहिले महंत ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांची ५९ वी पुण्यतिथी यावर्षी १४ जानेवारी रोजी येत आहे. गडाच्या परंपरेनुसार संत भगवानबाबांच्या समाधीचा महाभिषेक सकाळी होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत श्रीक्षेत्र भगवानगडाचे विद्यमान महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन होईल. त्यानंतर आलेल्या समस्त भाविकांना महाप्रसाद देण्यात येणार आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी संत भगवानबाबांचे देशभरातील भाविक भक्त बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. श्रीक्षेत्र भगवानगडावर संत भगवानबाबा यांचे स्वप्न असणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचे भव्यदिव्य मंदिर महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने साकारत आहे. भगवानबाबांच्या समाधीचे दर्शन आणि माऊली मंदिराचे काम डोळे भरून पाहण्यासाठी भाविकभक्त लांबून येत असतात. आलेल्या भाविकांच्या दर्शनाची आणि महाप्रसादाची चोख व्यवस्था महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गडाचे विश्वस्त मंडळ आणि पंचक्रोशीतील भाविक यांच्या सहभागातून करण्यात येते. दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. दिवसेंदिवस भगवानगडावर येणाऱ्या भाविकांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. महंत नामदेव महाराज शास्त्री यांची ख्याती महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरात ज्ञानेश्वरी भावकथेमुळे पोहोचली आहे. आनंदाचे सिद्धांत सोशल मीडियात प्रचंड लोकप्रिय झाले आहेत. त्यामुळे पुण्यतिथीला न्यायाचार्य महंत नामदेव शास्त्री महाराज यांचे अमृततुल्य कीर्तन प्रत्यक्ष ऐकण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी भगवानगडावर होत असते. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर, राजकीय नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी, अधिकारी आणि भाविक भक्त भगवानबाबांच्या चरणी

(उर्वरीत पान २ वर)



बीड - राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने १२ जानेवारी राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ यांना अभिवादन करताना माजी आमदार उषाताई दराडे, कमलताई निंबाळकर महिला प्रदेश उपाध्यक्ष, राणीताई शेख जिल्हा सचिव आणि अनिताताई वाघमारे जिल्हा संघटक.

## नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कडक कारवाई आणि जनजागृती करा - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई |प्रतिनिधी**

**नायलॉन मांजामुळे राज्यात काही भागात नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काही प्रकरणात, तर जीवितहानी झालेली आहे. अशा घटना टाळण्यासाठी नायलॉन मांजाच्या उत्पादनावर बंदी आणत राज्यात ज्या ठिकाणांहून तसेच ऑनलाइन मांजा विक्री केली जात आहे, अशा ठिकाणी सक्त कारवाई करण्यात यावी. मांजाच्या उपयोग टाळण्यासाठी जनजागृती करण्यात यावी, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज दिल्या.**



उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई, ठाणे, नाशिक, जळगांव, धुळे पुणे, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका क्षेत्रातील नायलॉन मांजा उपयोगावरील प्रतिबंधात्मक कारवाईबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे पद्धतीने बैठक घेतली. बैठकीला पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनीता सिंघल, मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, पोलीस उपायुक्त (उपक्रम) श्री. पठाण, छ. संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण पवार, ठाणे पोलीस आयुक्त प्रशांत परबकर, नाशिक पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, धुळे अतिरिक्त पोलीस अधिक्षक किशोर काळे, पुणे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार, जळगांवचे अति. पोलीस अधिक्षक अशोक नकाते दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



बीड - स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी बीड शहरातील राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या अर्धाकृती पुतळ्याला विनम्र अभिवादन केले.जिजाऊ जन्मोत्सवानिमित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड, मुकेशजी घुमरे, मनोज भैय्या डोंगरे सर्व उपस्थित होते.

## आता कोणत्याही कागदपत्रासाठी मुद्रांक शुल्क (बाँड पेपर) भरण्याची आवश्यकता नाही

### सह-दुय्यम निबंधक बालाजी दारेवार

माजलगाव (प्रतिनिधी)

शासकीय कार्यालय व न्यायालय यांच्यासमोर दाखल करावयाच्या व इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर आणि शपथपत्रावर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क (बॉड पेपर)शासन आदेशाने माफ करण्यात आले आहे. त्यामुळे आता कोणत्याही कागदपत्रासाठी मुद्रांक शुल्क (बाँड पेपर घेऊ नये)भरु नये, असे आवाहन बालाजी दारेवार माजलगाव दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी केले आहे.

माननीय उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर यांचे संदर्भ क्र.१ नुसार शासकीय कार्यालयात तसेच न्यायालयात प्रतिज्ञापत्र किंवा शपथपत्र सादर करताना नागरिकांकडून मुद्रांकाचा



(बॉड पेपरचा)आग्रह धरू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.त्यानुसार महाराष्ट्र शासन नोंदणी विभाग व मुद्रांक विभाग ३० ऑक्टोबर २०२४ च्या आदेशानुसार जात प्रमाणपत्र,उत्पन्नाचे प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र,विवाह नोंदणी व शासनाकडून मिळणाऱ्या अनेक प्रमाणपत्रांसाठी तसेच शासकीय कार्यालयासमोर, न्यायालयासमोर दाखल करावयाच्या तसेच इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर व शपथपत्रांवर अकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क(बाँड पेपर)माफ केले आहे.या ऐवजीकागदावर प्रतिज्ञापत्र किंवा शपथपत्र घेण्यात यावे असे सांगितले.त्यामुळे सर्व मुद्रांक (बॉड

(उर्वरीत पान २ वर)

## राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धा संपन्न

### तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

बीड :प्रतिनिधी

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, बीडच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या व राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून या आदर्श मातांना अभिवादन करण्यात आले. या उपक्रमा अंतर्गत शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी बीड शहरातील धानोरा रोड येथील राजयोग मंगल कार्यालय येथे महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष, मा. प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक मा.




श्रीमती भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंके (फॅशन डिझायनर, शिल्पकार, चित्रकार,छ. संभाजीनगर.), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. यशवंत कांबळे (प्रसिद्ध उद्योजक, पुणे.) मा. महेश साळुंके ( वास्तुतज्ज्ञ, छ. संभाजीनगर.), तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा. राम गायकवाड, प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले( तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड.) उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास परीक्षक म्हणून मा. प्रज्ञा जमधाडे ( लॅक्मे-प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट), मा. जेधे

(उर्वरीत पान २ वर)

# संपादकीय

## विक्रमी आणि वेताळ

माणसाला विक्रमांचे कोण वेड. हे वेड एवढे टोकाचे की आपण पृथ्वीची शक्य तेवढी नासधूस करण्यातही मागे राहण्यास तयार नाही. त्यातही आपण 'अग्रेसर' ठरल्याचे नुकतेच अधिकृतरीत्या जाहीर झाले. आजवरचा सर्वाधिक तप्त दिवस, सर्वाधिक तप्त महिना, सर्वांत उष्ण दशक असे नवनवे विक्रम प्रस्थापित करून झाले. आता 'कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस'ने नुकत्याच सादर केलेल्या अहवालानुसार २०२४ हे आजवरचे सर्वांत तप्त वर्ष ठरल्याचे सिद्ध झाले आहे. आणखीही एक विक्रम नोंदविण्यात आपण 'यशस्वी' झालो आहोत- तो म्हणजे औद्योगिकीकरणापूर्वीच्या तापमानापेक्षा १.५ अंश सेल्सियस अधिक सरासरी तापमान नोंदविण्याचा. हा उंबरठा न ओलांडण्याचे उद्दिष्ट आजवर विविध पर्यावरण परिषदांत अधोरेखित केले गेले होते. मात्र पुढे जाण्याच्या स्पर्धेत नेमके 'कोणत्या क्षेत्रात' याचाही विसर पडून आपण हा उंबरठादेखील ओलांडला. आता आणखीही एक जळजळीत वास्तव पुढे आले आहे. ते म्हणजे स्पर्धेत सर्वांत पुढे असलेलेही यापुढे झळांपासून सुरक्षित राहू शकणार नाहीत. दोनच दिवसांपूर्वी अमेरिकेतल्या हॉलीवूड टेकड्यांवर लागलेला भीषण वणवा आणि त्यामुळे तेथील धनाढ्यांना तिसऱ्या जगातल्या खेड्यातील पूर किंवा भूकंपग्रस्तांप्रमाणे सुरक्षित स्थळी करावे लागलेले स्थलांतर हे त्याचेच द्योतक. त्यामुळे हा प्रश्न आता खऱ्या अर्थाने जागतिक झाला आहे.

मागचे वर्ष एल-निनोचे होते, त्याचा प्रभाव तर पडणारच होता, अशी सबब देऊन आजवरच्या पातकातून मुक्त होता येणार नाही. एल-निनो आणि ला-निना हा निसर्गक्रमाचाच भाग आहे. त्याला दोष देऊन हात झटकणे आणि जगभरात ज्या उष्णतेच्या लाटा, वणवे, पूर, ढगफुटी, दरड कोसळणे अशा घटना घडल्या त्यांचे खापर एकट्या एल-निनोवर फोडणे हा शुद्ध अप्रामाणिकपणाच ठरेल. स्वत:ला या ग्रहावरील सर्वाधिक बुद्धिमान प्राणी म्हणवणाऱ्या माणसानेच या ग्रहाची सर्वाधिक हानी केली, हे वास्तव नाकारता येणारच नाही. गतवर्षाची सुरुवातच झाली ती चक्रीवादळाने. वर्षाच्या पहिल्याच दिवशी मादागास्करमध्ये अलवारो वादळ धडकले. ज्या व्हेनेझुएलात एकेकाळी सहा हिमनद्या होत्या, तो देश याच वर्षात आधुनिक काळात सर्व हिमनद्या नाहीशा झालेला देश ठरला. आपल्या शेजारच्या बांगलादेशाला पुराचा जबरदस्त फटका बसला. जगात अशी स्थिती असताना भारताच्या नंदनवनातील गुलमर्ग भर जानेवारीत बर्फाविना उघडे पडले होते. अशाने पर्यटकांचा तर हिरमोड होतोच, पण प्रचंड फटका बसतो, तो तेथील शेतीला, जलसाठ्यांना. साहजिकच उदरनिर्वाहापुढे दुहेरी प्रश्नचिन्ह उभे राहते. राजधानी नवी दिल्लीची पुरामुळे कोंडी झाली. एरवी उत्तर भारताला सतावणाऱ्या उष्णतेच्या लाटांनी ईशान्येकडील राज्यांनाही आपल्या तीव्रतेची झलक दाखविली. वायनाडमध्ये कोसळलेली दरड, हिमाचल प्रदेशातील ढगफुटी, बंगळुरूला भेडसावणारी तीव्र पाणीटंचाई या सर्व निव्वळ नैसर्गिक घटना होत्या, असे म्हणता येणार नाही. अल्पावधीत सरासरीच्या कित्येक पट अधिक पाऊस कोसळणे आणि मग आठवडेच्या आठवडे कोरडे जाणे, नदीकिनाऱ्यांवर अतिक्रमण करून उभारलेले 'रिव्हर व्ह्यू'चे इमले धडाधड कोसळणे, जोशीमठमध्ये जमिनीला तडे जाणे.

# ठरलं! दि.१ ते ९ फेब्रुवारी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा

## शिवसेना जिल्हाप्रमुख जगताप, मुळूक, गलधर यांच्या हस्ते चंपावती महोत्सवाचे पोस्टर विमोचन!

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गत दोन वर्षांच्या अफाट यशानंतर जिल्ह्याभरातील अनेक शाळांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, पालक बालकलाकार आणि कलाप्रेमींच्या खास आग्रहास्तव याहिवर्षी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान आठ दिवासीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे पोस्टर विमोचन काल दि. १२ जानेवारी २०२४ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यादरम्यान चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे



महाकरंडक स्पर्धेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचा आभारपूर्वक सत्कार केला. पोस्टर विमोचनाच्या कार्यक्रमानंतर महोत्सवाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत बीड शिवसेनेच्या तिन्ही जिल्हाप्रमुखांनी मिळून महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व बाल कलाकारांची गैरसोय होऊ नये यासाठी सूचना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बीड शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांच्यासह चंपावती महोत्सवाचे व्यवस्थापक कलावंत लक्ष्मीकांत दोडके व अनिकेत कांबळे उपस्थित होते. यावर्षी चंपावती महोत्सवामध्ये समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, फॅमिली नृत्य, एकपात्री अभिनय, समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या सर्व स्पर्धाइयत्ता पाहिली ते तिसरी, इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते दहावी या वयोगटात होणार असून प्रत्येक स्पर्धा प्रकारातील प्रत्येक वयोगटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ तीन पारितोषिके काढण्यात येणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना शिल्ड आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या महोत्सवात जी शाळा बक्षीसांची सर्वोच्च संख्या प्राप्त करेल त्या शाळेस मान्यवरांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक बहाल करण्यात येणार आहे. याबरोबरच

उत्कृष्ट नृत्य शिक्षक, उत्कृष्ट संगीत शिक्षक, उत्कृष्ट चित्रकला शिक्षक, उत्कृष्ट नाट्य शिक्षक, उत्कृष्ट प्राचार्य तथा उत्कृष्ट उपक्रमशील शिक्षक अशी विशेष पारितोषिक देण्यात येणार आहेत. बीडच्या कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांना चंपावती सन्मान या पुरस्काराचे देखील वितरण करण्यात येणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

# पर्यावरण आणि वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडून विभागाचा आढावा


छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

राज्यातील पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पर्यावरण आणि वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे सांगितले. पर्यावरण विभागातील कामांमध्ये लोकसहभाग घेत पर्यावरणपूरक वातावरणासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचेही त्या म्हणाल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री पंकजा मुंडे यांनी आज मराठवाडा विभागातील पशुसंवर्धन व प्रदुषण नियंत्रण मंडळ विभागाचा आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन आयुक्त प्रवीणकुमार देवरे, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, खाजगी सचिव मंदार वैद्य, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक पशुसंवर्धन सहायुक्त गणेश देशपांडे, लातूर प्रादेशिक



### पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देणार – पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

पशूसंवर्धन सहायुक्त राजकुमार पडीले, शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्राचे विभागीय व्यवस्थापक डॉ प्रशांत चौधरी तसेच मराठवाडा विभागातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी उपस्थित होते.



# सौ. के.एस.के.अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बीड (प्रतिनिधी)

येथील सौ. के.एस.के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात रासेयो अंतर्गत दि. १२/०१/२०२५ रोजी राजमाता जिजाऊ यांची जयंती व स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवक दिन' म्हणून साजरी करण्यात आली. या वेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके होते. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते, काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आईसाहेब जिजाऊचे चरित्र मांडले तर काहिंनी स्वामी विवेकानंद यांची विचारधारा, तत्व, आचरण, बुध्दीमत्ता व त्यांच्या सामाजिक जीवनशैली वर मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गोविंद साळुंके म्हणाले की विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांच्या गुणांचे अवलोकन करून ते आत्मसात करावे. तसेच राजमाता जिजाऊ सारखे संस्कार जर प्रत्येक स्त्रीने आपल्या मुलावर केले तर भारत देश विकसित व्हायला वेळ लागणार नाही. तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जिवनाचे काही क्षण व त्यांचे विचार मांडले. स्वामी विवेकानंद हे युवक असतांना केलेल्या कार्याची माहिती दिली व आजच्या युवकाला त्यांच्या गुणांची आवश्यकता का आहे हे स्पष्ट केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## पान१ वरून...

**वाल्मिक कराडला ...**

हत्येला एक महिना होऊन गेला. त्याच्या निषेधार्थ पैठणमध्ये मोर्चा काढण्यात आला आहे. यात सर्वपक्षीय नेतेही सहभागी झाले. या प्रकरणात वाल्मिक कराडने भरपूर संपत्ती जमावली, त्याच्याकडे काम करणाऱ्या अनेकांच्या नावावर जमिनी असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.

सुरेश धस यांनी थेट नाव घेतलं नसलं, तरी आकाच्याआडून धनंजय मुंडेंवर जोरदार हल्लाबोल केला. यातच मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडेंवर टीका केली. धनंजय मुंडे यांनी षडयंत्र सुरू केलं आहे. आता माझ्यावर केसेसचा सपाटा लावल्याचा आरोप त्यांनी केला. तसंच २५ जानेवारीच्या उपोषणानंतर त्यांना सोडणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

**आता कोणत्याही...**

पेपर)विक्रेते, महा-ई- सेवा केंद्र चालक,सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी याची नोंद घ्यावी.त्याचप्रमाणे नागरिकांनीही वरील कामांसाठी लागणारे मुद्रांक शुल्क भरू नये(बाँड पेपर घेऊ नये)असे आवाहन बालाजी दारेवार सह-दुय्यम निबंधक वर्ग-२ माजलगाव यांनी केले आहे.

**संत भगवानबाबांची..**

नतमस्तक होण्यासाठी भगवानगडावर येतात. भाविकांनी यावर्षी देखील शिस्तीत संत भगवानबाबांच्या पुण्यतिथी सोहळ्याला आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री आणि विश्वस्त मंडळाने केले आहे.

यावर्षीच्या पुण्यतिथी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायमूर्ती श्री गोविंदराव सानप हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी श्रीक्षेत्र भगवानगडाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

**राज्यस्तरीय ड्रेस...**

सर ( प्रसिद्ध डिझायनर), यांची उपस्थिती लाभली.

यावेळी स्पर्धेत सहभाग म्हणून बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे मुंबई, ठाणे, यवतमाळ, जळगाव, अहमदनगर, नाशिक, नांदेड आदि जिल्ह्यातील १३० विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला तर कार्यक्रमासाठी खास आवर्जून आपल्या पाल्यांचे कलाकृतीतील कौतुक पाहण्यास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी व डिझाईनर यांनी डिझाईन केलेले डिझाईनिंग ड्रेस मॉडेल्स यांना परिधान करून प्रदर्शित करण्यात आले. यावेळी राज्यातील १३ महाविद्यालय व ८ प्रसिद्ध बुटिक मधील डिझायनर सह अन्य डिझायनर यांनीही हिरारीने सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या वेळी एकूण फर्स्ट राऊंड, सेमी फायनल व फायनल असे राऊंड घेण्यात आले. प्रथम बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम १०००० रुपये, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र , दुसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ७००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तिसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ५००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते तर इतर सर्व सहभागी डिझायनर यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

# जग विध्वंसाला वैतागले, शांतीची अपेक्षा करतेय - सनदी लेखापाल प्रकाश पाठक

## सहकार भारती स्थापना दिवस ; मान्यवरांची उपस्थिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुंफताना व्याख्याते प्रकाश पाठक (सनदी लेखापाल) यांनी 'पंचप्रण' – सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर आपले अभ्यासपूर्ण चिंतन मांडले.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय, लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमराव कांदे (रा.स्व.संघ, जालना विभाग), प्रमुख व्याख्याते प्रकाश पाठक (सनदी लेखापाल, धुळे), बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, बँकेच्या माजी अध्यक्ष व विद्यमान संचालिका शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, प्रा.अशोक लोमटे, बाळासाहेब देशपांडे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. तृतीय पुष्प गुंफताना प्रकाश पाठक (धुळे) यांनी 'पंचप्रण' – सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर बोलत असताना सांगितले की, आजच्या व्याख्यानाचा विषय आपल्या जगण्याशी एकरूप आहे. 'पंचप्रण' – म्हणजे कुटुंब, समरस जीवन, पर्यावरण, स्वदेशी जागरण आणि नागरिकांची कर्तव्ये हे समजून घेवून देशासाठी त्याग, समर्पण भावनेतून बलिदानासाठी तत्पर असणे होय, या देशावर प्रेम करावे, संस्कृती संवर्धन करणे, निष्ठापूर्वक त्याचे पालन करणे आवश्यक आहे. आपली धारणा, निती मुल्यांवर श्रध्दा ठेवून वाटचाल करणे, समाजजीवन हे रथचक्रासारखे आहे. भूमिचा स्वर्ग करणारी माणसं कार्यरत झाली की, आपण पतनाकडून उत्थानाकडे जातो. जगात अनेक संस्कृती निर्माण झाल्या आणि



कालौघात त्या नष्ट ही झाल्या पण, हिंदू धर्म व संस्कृती विनाशाच्या कालखंडातही संपुष्टात आली नाही. अध्यात्मिक राष्ट्र अशी जगात भारताची ओळख आहे. सामुहिक प्रयत्न व सर्वसमावेशकता जोपासल्यामुळे हे शक्य झाले आहे. समाजाच्या उत्थानासाठी स्वतःला गाडून घेण्याची भूमिका घ्यावी लागते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आदर्श संकल्प, सातत्यपूर्ण विधायक कार्य आणि मार्गदर्शक सुत्रांमुळे सामाजिक जीवनात त्याचे चांगले पडसाद पहावयास मिळत आहेत. म्हणून आज विविध क्षेत्रात आदर्श, चारित्र्यसंपन्न, राष्ट्रप्रेमी, समर्पण, न्याय भूमिका, निष्कलंक, निष्कपट भावना जोपासत सेवाकार्य करीत योगदान देणारी व्यक्तीमत्व निर्माण झाली आहेत असे सूचक वक्तव्य पाठक यांनी केले. स्वातंत्र्य, बंधूता, समजूतदारपणा, कुटुंब व्यवस्था, नातेसंबंध, संस्कार, संस्कृती, पर्यावरण संवर्धन, देशाभिमान, सामाजिक समरसता, स्वयंपूर्णता, स्वयंसज्जता, स्वयंसक्षमीकरण, कर्तव्यधिष्ठता निर्माण झाली पाहिजे. यासाठी भारतीयांनो वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक आणि सामाजिक पातळीवर आपण एकत्र येऊन सामाजिक परिवर्तनासाठी सुरूवात केली पाहिजे. आज संपूर्ण जग हे विध्वंसाला वैतागले आहे, भारताच्या पुढाकाराने जगात शांतता प्रस्थापित व्हावी अशी अपेक्षा करतेय, विश्वगुरू म्हणून आपल्यावर असलेल्या या जबाबदारीची जाणीव ठेवून नि:स्पृह, त्याग भावनेतून आपले योगदान द्यावे व भविष्यातील यशस्वी वाटचाल करावी असे आवाहन प्रकाश पाठक (धुळे) यांनी केले. प्रारंभी बँकेच्या संचालिका शरयूताई हेबाळकर यांनी 'सहकार भारती – सहकाराचे एक शिखर संघटन' या विषयावर बोलत असताना आण्णासाहेब गोडबोले, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, माधवराव गोडबोले आणि लक्ष्मणराव इनामदार यांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण केले. 'सहकार भारती स्थापना दिवस' निमित्त मागील ४६ वर्षांपासून सहकार भारती सहकार क्षेत्रात करीत असलेल्या कार्याची नेमकी माहिती दिली. यावेळी 'सहकार भारती जिंदाबाद' चा जयघोष करण्यात आला. अध्यक्षीय समारोपपर भाषणात उत्तमराव कांदे (रा.स्व.संघ, जालना विभाग) यांनी दीनदयाळ बँकेने परिसरातील बँका, पतसंस्था, पतपेढी व सहकारी संस्था यांच्याकरिता प्रशिक्षण आयोजित करावे व त्यांना सहकार भारती परिवाराशी जोडावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सुरूवातीला पाहुण्यांचा परिचय बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी करून दिला. सुत्रसंचालन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संचालक बाळासाहेब देशपांडे यांनी मानले. सौ.लताताई पत्की यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अंबाजोगाईतील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवक, रसिक श्रोते उपस्थित होते. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा – संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. तसेच १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# छत्रपती शाहू महाराज आदर्श शिक्षक जीवन गौरव पुरस्काराने श्री गोरख झोडगे सन्मानित



बीड ।प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या विद्यालय बीड येथील श्री. गोरख झोडगे यांना संस्थेच्या वतीने श्री छत्रपती शाहू महाराज आदर्श शिक्षक जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह सन्मानपत्र शाल व श्रीफळ या स्वरूपाचे पुरस्काराचे स्वरूप होते. श्री गोरख झोडगे यांची शैक्षणिक, सामाजिक पर्यावरण विषयक, कार्याची दखल घेऊन संस्थेने पुरस्कारासाठी निवड केली. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक मा. प्रा. शिवाजीराव जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, संस्थेचे संचालक प्राचार्य ए .आर. डंबरे, मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी. मुख्याध्यापक श्री.आर.टी.राऊत, प्राचार्या श्रीम. आर.डी.लोखंडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविका मध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी. म्हणाल्या की, श्री.झोडगे जी. एस यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक करून त्यांनी त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रा. जे. पी. शेळके म्हणाले की, शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असतो. भावी पिढीला घडविण्याचे तू काम करत असतो. श्री.झोडगे सर यांनी शिक्षक हा पेक्षा किंवा व्यवसाय नसून भूमिका आहे असे समजून संस्थेच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या शाळेत प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करतात. हरित सेनेच्या माध्यमातून शाळेच्या प्रांगणात वृक्ष लागवड करून संगोपनाचे हे काम त्यांनी केले. विज्ञान विषयाचे ते विद्यार्थी प्रिय शिक्षक आहेत. त्यांची ही विद्यार्थी प्रियता व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची तळमळ पाहून त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

यावेळी सत्कार मूर्ती आदर्श शिक्षक श्री गोरख झोडगे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की संस्था, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, विद्यार्थिनींच्या पालक ,आणि विद्यार्थिनी यांचा सहकार्यामुळे मला चांगले काम करण्यासाठी पाठबळ मिळाले. पुरस्काराने माझी जबाबदारी वाढली आहे त्यामुळे पुढील काळातही दुरुस्त काम करत राहील पुरस्कार दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जगताप एस.सी.यांनी तर आभार प्रदर्शन श्रीम.सोनवणे एम.एस. यांनी केले.

# राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालय मध्ये उत्साहात संपन्न



बीड ।प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये राष्ट्रमाता, स्वराज्य जननी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांना जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहामध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांची शालेय परिसरातून प्रभात फेरी संपन्न झाली. या प्रसंगी या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी प्रेरित करून रयतेचे स्वप्न साकार केले तर स्वामी विवेकानंद यांनी वैदिक धर्माची पताका जागतिक पातळीवर फडकावून राष्ट्रनिर्मितीसाठी युवकांना प्रेरित केले असे विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक यु.बी. पवळ आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी संतोष मेश्राम, आर.बी.घुले, श्रीमती एन.जी.मुंडे हे शिक्षक, सुभाष गायकवाड, डी.जी.हजारे, एल.बी हजारे हे शिक्षकेतर कर्मचारी, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही.खरसाडे सह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सकाळी माँसाहेब जिजाऊ उद्यान,राजीव गांधी चौक,बीड येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यास उपस्थित राहुन माँसाहेब जिजाऊंना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शिवसंग्राम भवन, नगर रोड बीड येथे माँ जिजाऊंना अभिवादन करण्यात आले, यावेळी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शासकीय कार्यालयातील कामासाठी स्टॅम्प पेपरची मागणी करू नये

बीड ।प्रतिनिधी

**शासकीय कामकाजासाठी आणि विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शंभर रुपये मूल्यांचे स्टॅम्प पेपर आता रद्दबातल झाल्याने अनेक बाबतीत ५०० रुपये मूल्याच्या स्टॅम्प पेपरची मागणी होते ती यापुढील काळात करण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश व सूचना नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयातर्फे जारी करण्यात आल्या आहेत.**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आधिसूचना क्रमांक मुद्रांक २००४२/ १६६३/ प्र.क्र. ४३६/-१ दिनांक १/७/ २००४ अन्वये शासकीय कार्यालयातील जात प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र, तसेच राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र या शासकीय कार्यालयासमोर करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक अधिनियमातील अनुसूची एक मधील अनुच्छेद -४ अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७२ दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ अन्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ट -एक मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आली असून अनुच्छेद क्रमांक ४, ५, ८, , २७, ३०, ३८, ४४, ५०, ५२, ५८ मध्ये रुपये १००/- किंवा रुपये २००/ - ऐवजी रुपये ५००/- मुद्रांक शुल्क करण्यात आले आहे.

उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगरर यांचे संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना नागरिकांकडून मुद्रांकाचा आग्रह करू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ई-सेवा केंद्रामध्ये नागरिकांकडून सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी रुपये १००/- स्टॅम्प पेपरची मागणी करीत असतात. दिनांक १४/ १०/ २०२४ च्या शासन निर्णयानुसार ही सेवा केंद्रामध्ये पक्षकाराकडून रुपये ५००/- चे स्टॅम्प पेपरची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय कार्यालय तसेच न्यायालयासमोर दाखल करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ केलेले असल्याने या संदर्भात आपल्या अधिपत्याखाली असलेले उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना मार्गदर्शन करण्यात यावे, असे नोंदणी महानिरीक्षक यांनी स्वतंत्र पत्राद्वारे कळविले आहे.

# विशेष व्हायचे आहे, अवशेष नाही - डॉ. सुधाकर शेंडगे

## अट्टल महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या कार्यशाळेचे उद्घाटन



गेवराई ।प्रतिनिधी

'आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभाग अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करते. आपल्याला आपले चरित्र चांगले घडवायचे असेल तर चांगल्या लोकांचे चरित्र वाचले पाहिजे त्यातूनच उत्तम चारित्र्य घडत असते. माणसे वाचली पाहिजे व त्यातून स्वतःला वाचता आले पाहिजे. शिक्षणातून नोकरीच महत्त्वाची नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःला सिद्ध करून आपले जीवन जगता येणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपल्याकडे जी कौशल्ये आहेत त्यांचा उपयोग करून चांगले जीवन जगता येते. आपल्याकडे जे शेष (बाकी) आहे, त्यालाच विशेष बनवले तर आपण अवशेष होणार नाही' असे प्रतिपादन डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार केंद्राच्या वतीने 'विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेची सुरुवात रोपास पाणी देऊन उद्घाटन करून झाली. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य मेजर विजय सांगळे हे होते, तर उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सुधाकर शेंडगे हे होते. डॉ. सुधाकर शेंडगे यांचे मूळ गाव गेवराई तालुक्यातील कोल्हेर हे आहे. त्यांच्या पूर्वायुष्यातील संघर्ष आणि आठवणी ऐकताना विद्यार्थ्यांना गहिवरून आले होते.

त्यांनतर झालेल्या 'संभाषण कौशल्य' या विषयावरील सत्रात डॉ. समाधान इंगळे यांनी मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकासात संभाषण कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ते आपण आपल्या मनात कोणताही न्यूनगंड न बाळगता व्यक्त होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. तर दुसऱ्या सत्रात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर डॉ. संदीप वंजारी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करायचे असेल तर आपणास जिद्द, मेहनत आणि चिकाटी या तीन सूत्रानुसार यश प्राप्त करता येऊ शकते.कार्यशाळेचे प्रास्ताविक आजीवन विस्तार सेवा केंद्राचे समन्वयक व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रेवननाथ काळे यांनी केले. आजीवन शिक्षण विस्तार सेवा केंद्राच्या वतीने घेण्यात आलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमाचा लेखा जोखा आणि कार्यशाळेचा उद्देश त्यांनी सांगितला. यावेळी मराठी विभाग प्रमुख संदीप बनसोडे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. देव रिठे, डॉ. अमोल शिरसाठ, प्रा. अरुण जाधव, प्रा. मनोजकुमार ठोसर, प्रा. दौलत मंचरे, प्रा. वडघणे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# कासार समाज बीडच्या अध्यक्षपदी गजानन जवकर तर सचिवपदी किरण जवकर यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

**श्री कालिकादेवी मंदिर ट्रस्ट बीड व कासार समाज बीड यांची दि. ०९ जानेवारी २०२५ रोजी कालिकादेवी मंदिर बलभीम चौक बीड येथे समाजाच्या व कालिका देवी मंदिर ट्रस्टच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक संपन्न झाली, यावेळी प्रथमच सर्व समावेशक समाज कुटुंब संख्येनुसार वार्ड रचना करण्यात आली व कुटुंब संख्येनुसार संचालक निवड करण्यात आली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी समाजाचे ट्रस्टी म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी उमेश लक्षण हुलजुते तर सहाय्यक भालचंद्र भांडेकर हे होते. बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी गजानन भास्करराव जवकर तर सचिवपदी किरण कालिदास जवकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**




संघटनेचे कार्याध्यक्ष म्हणून नागेश वसंत शृंगारे उपाध्यक्ष म्हणून प्रवीण प्रभाकर कोळपकर सहसचिव गणेश कृष्णराव वनगुजरे कोषाध्यक्ष राहुल रवींद्र जवकर तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून अमित प्रतापराव सासवडे यांची निवड करण्यात आलीपुढील पाच वर्षासाठी समाजाच्या व मंदिराच्या विविध विकास कामे व विविध उपक्रम घेण्याचे ठरले यात वधू वर परिचय मेळावे व सामुदायीक विवाह सोहळे , व्यापारी वर्गासाठी लोन मेळावे ,नवरात्र उत्सव ,समाजातील बेरोजगार मुलांसाठी मेळावे, गुणवान विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन मेळावे असे विविध उपक्रम राबवण्याचे ठरले. शेवटी श्रीरंग नानाभाऊ लातूरकर यांनी सर्वांचे आभार मानले व बैठकीची सांगता झाली. बैठकीसाठी नवनिर्वाचित कार्यकारी मंडळ उपस्थित होते यात माजी अध्यक्ष शेखर जवकर, सोमनाथ बारस्कर , अशोकजी तांबट ,गणेश दगडे,अमित सासवडे,अमोल जवकर, प्रशांत धुमाळ,कमलाकर भांडेकर,रामेश्वर हुलजुते,महारुद्र वीर,रमेश रासने,मदन पाटील,सुनील पाथरकर,कृष्णराव वनगुजरे , सतीश जवकर व रत्नाकर जवकर हे सर्व उपस्थित होते.



# आम आदमी पार्टीच्या वतीने जिजाऊ जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने राजीव गांधी चौक येथील राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार व घोषणा देऊन राजमाता राष्ट्रमाता जिजाऊची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व बांधवांना जयंतीच्या शुभेच्छा आम आदमी पार्टीच्या वतीने माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष शहराध्यक्ष सय्यद सादिक रामभाऊ शेरकर माऊली शिंदे इत्यादी कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात साजरी करण्यातआली व सर्वांना जिजाऊ जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल

## येथे महिलांसाठीआयोजित मोफत तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद – डॉ. मीरा ढाकणे (नागरे)

बीड ।प्रतिनिधी

आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त खास महिलांसाठी मुळव्याध मोफत तपासणी शिबिर महिला मुळव्याध तज्ञ डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांनी आयोजित केले होते. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ दरम्यान या शिबिराचा लाभ मुळव्याध त्रस्त रुग्णांनी मोठ्या संख्येने रुग्णांचा प्रतिसाद पाहता लवकरच आणखीन असे कॅम्प आयोजित केले जातील असे मूळव्याध तज्ञ डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांनी जाहीर केले.

बीड शहरातील साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डीपी रोड, बीड बस स्टँड च्या पाठीमागे, डॉक्टर लाईन येथील शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल अँडव्हान्स अँनोरेक्टल पाइल्स लेझर सेंटर येथे राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त महिलांसाठी दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान मोफत तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचा लाभ मुळव्याधाने त्रस्त असलेल्या महिलांनी मोठ्या संख्येने घेतला.शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल येथील प्रसिद्ध महिला मूळव्याध तज्ञ डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांनी त्यांच्यावर उपचार केले आणि या रोगातून मुक्त होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना देखील पिढी त्यांना समजावून सांगितल्या. या शिबिराला रुग्णांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता भविष्यात देखील रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा समोर ठेवून सामाजिक जाणीव यातून अशा शिबिरांचे आयोजन वेळोवेळी केले जाईल असे स्पष्ट केले.

## पत्रकारांच्या महिला कुटुंबियांनी देखील घेतला शिबिराचा लाभ

बीड शहरामध्ये पहिल्यांदाच महिला मूळव्याध तज्ञ शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटलच्या डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त महिलांसाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये बीड जिल्ह्यातील पत्रकारांच्या कुटुंबातील महिला आणि महिला पत्रकारांसह त्यांच्या कुटुंबातील महिलांसाठी मुळव्याधाने त्रस्त असेलेल्या रुग्णांवर मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिराचा लाभ पत्रकारांच्या कुटुंबीयातील अनेक सदस्यांनी घेऊन पत्रकार शेख आयेशा यांनी केलेल्या आवाहनानुसार या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.



बीड - राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्त्या कमलताई निंबाळकर यांनी मासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह येथे राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी



बीड ।प्रतिनिधी

अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती यांची जयंती साजरी करण्यात आली. सदरील जयंती साठी मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड,मंगेश बबनराव जाधव जिल्हा परीविक्षा अधिकारी, अशोक तांगडे बाल कल्याण समिती अध्यक्ष ,अॅड.तत्वशिल कांबळे बाल न्याय मंडळ सदस्य,बालीका शिंधीकुंमठे शिक्षीका, बडे नितीन,चव्हाण सुनिल,अभिनय सरवदे,शेख रिजवान ,शेख कैफ मुस्तफा आदी उपस्थित होते.

## श्री श्री राधागोविंद मंदिर (इस्कॉन बीड) २२ वा वर्धापन दिनानिमित्त विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

श्री श्री राधागोविंद मंदिराचा २२ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.१५ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१५ ते १७ जानेवारी या तीन दिवसीय 'कृष्णकथेचे' आयोजन करण्यात आले आहे. कथेचे प्रवक्ते आदरणीय श्रीमान ध्रुवनारायण प्रभुजी (वृंदावनधाम) हे असणार आहेत. ही कथा दुपारी ४ ते सायं.७ पर्यंत असणार आहे. तर शनिवार दि.१८ जानेवारी रोजी श्री कृष्णबलराम भगवंतांची शोभारथयात्रा बीड शहरातून मोठ्या उत्साहात काढली जाणार आहे. ही रथयात्रा दुपारी २.०० वाजता श्री श्री राधागोविंद मंदिर-सावता माळी चौक, मोंढा रोड-डॉ.आंबेडकर पुतळा-माळीवेस, सुभाष रोड, अहिंसा चौक - सिध्दीविनायक कॉम्पलेक्स-जिजामाता चौक या मार्गे रात्री ८.०० वा.पर्यंत श्री श्री राधागोविंद मंदिरात पोहचेल. तसेच रविवार दि.१९ रोजी श्री श्री राधागोविंद मंदिराच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त सकाळी ९ ते दुपारी १ वा.पर्यंत भजन-अभिषेक-पुष्पाभिषेक-प्रवचन-महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी समस्त बीड जिल्ह्यातील भाविक-भक्तांनी या सर्व अध्यात्मिक कार्यक्रमांचा लाभ घेवून श्री श्री राधागोविंद देवांचा आशीर्वाद प्राप्त करावा असे आवाहन इस्कॉन बीडच्यावतीने करण्यात आले आहे.





## मौजे धोपटेश्वर येथे छत्रपती शिवराय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने राष्ट्रमाता मा जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

बदनापूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील मौजे धोपटेश्वर गांवामध्ये राष्ट्रमाता मा जिजाऊ यांच्या जन्मोत्सव छत्रपती शिवराय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने मा जिजाऊ यांचा जन्मदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. या निमित्ताने लहान मुलांना ड्रेस वाटप करण्यात आले राजमाता जिजाऊ यांचा वेशभूषा परिधान करून तरुण युवक युवतींना मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला मा जिजाऊ यांना विनम्र अभिवादन केलं या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा पोह्याचा नाश्ता ठेवण्यात आलेला होता कार्यक्रमाला कार्यक्रमास अण्णाभाऊ साठे पुरस्काराचे मानकरी श्रीविष्णू गवळी हे प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमास हजेरी लावली तर सामाजिक कार्यकर्ते दिलीप खाजेकर यांनी कार्यक्रमासह कुटुंब सहपरिवार हजेरी लावली सुनील खाजेकर , रामेश्वर ढगे काकासाहेब खाजेकर अध्यक्ष यांनी सर्वांचे अभिनंदन केले.यावेळी समाज बांधव व गावकरी मोठ्या

## ऑनलाईन आलेले ४० चाळीस हजार रुपये हॉटेल चालक वीर यांनी परत करून प्रामाणिकपणाचा आदर्श निर्माण केला

बीड ।प्रतिनिधी

अलीकडच्या काळात लबाडी आणि फसविगिरी वाढली असली तरी बहुतांशी अनेक माणसे प्रामाणिक आहेत. याचा अनुभव बीड शहरातील हॉटेल चालक स्वप्नील वीर यांनी दाखवून दिला आहे. बीड शहरातील लोटस हॉस्पिटल येथे असलेल्या स्वप्नील हॉटेलचे मालक स्वप्नील वीर यांना ऑनलाईन हॉटेलच्या खात्यावर आलेले ४० हजार रुपये तात्काळ परत करून वीर यांनी आपला प्रामाणिकपणा दाखवून दिल्या. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. बीड शहरातील नाट्यगृहाजवळ असलेल्या लोटस हॉस्पिटल येथे



आलेल्या स्वप्नील वीर यांच्या हॉटेल मालक स्वप्नील वीर यांच्या खात्यावर एका महिलेचे चुकून ऑनलाईन ४० हजार रुपये आले. महिलेच्या नातेवाईकांनी सदर बाब वीर यांच्य लक्षात आल्यानंतर वीर यांच्याशी संपर्क साधल्यानंतर स्वप्नील वीर यांनी तात्काळ सदर रक्कम परत दिली.वीर यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करून आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## आदिनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्काराने सन्मानित

अंबड ।प्रतिनिधी

सहकार भारतीच्या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त जालना जिल्हा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार देण्यात आला या पुरस्कार सोहळ्यामध्ये आदिनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आदिनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीला दुसरे पारितोषिक मिळालं या पुरस्कार सोहळ्यानिमित्त सहकार भारतीचे अध्यक्ष श्री श्री सचिन जी वाणी साहेब सहकार भारतीचे महामंत्री श्री ज्ञानेश्वर जी काळेसाहेब सहकार भारतीचे सदस्य श्री ड.इंगळे साहेब व महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनची कोषाध्यक्ष श्री तुपकर दादा



महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष श्री कुलकर्णी साहेब महाराष्ट्र राज्य फेडरेशन सर्व सदस्य यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला याप्रसंगी जालना जिल्ह्यातील सर्व पतसंस्थांचे कर्मचारी व चेअरमन व संचालक मंडळ उपस्थित होते आदिनाथ अर्बन च्या चेअरमन यांनी हा पुरस्कार सर्व खातेधारक व सभासद धारक व कर्मचारी यांनी दाखवलेल्या विश्वासाचा व प्रामाणिकपण्याचा पोच पावती आहे असे सांगितले व पुढील वाटचालीसाठी सदैव आमच्या सोबत राहावे असे नम्र आवाहन केले याप्रसंगी सहकार भारती सर्व सदस्यांचे मनस्वी असे आभार

# बीडच्या बार्शी नाका इमामपूर रोडवर रेल्वे थांबा द्या-खुर्शीद आलम

### शिष्टमंडळाने खा. सोनवणे सह आ.क्षिरसागरांची भेटले घेतली

**बीड(प्रतिनिधी)बीडकरांच्या जिव्हाळ्याच्या रेल्वे प्रश्न मार्गी लागत आहे लवकरच बीडच्या स्थानकातून रेल्वे धावताना दिसणार आहे, मात्र पालवन रोडवरील रेल्वे स्टेशन बीड शहरातील नागरिकांसाठी दूर पडू लागले आहे त्यामुळे बार्शी नाक्यावरील इमामपूर रोडवर रेल्वे थांबा करण्यासाठी ठराव घेऊन मंजुरी घ्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांचे शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांनी आज खा.बजरंग सोनवणे व आ.संदिप क्षीरसागर यांच्याकडे केली खा.बजरंग बाप्पाच्या निवासस्थानी जाऊन शिष्टमंडळासह खुर्शीद आलम यांनी निवेदन दिले आहे**

बीडचे रेल्वे स्टेशन पूर्वी बार्शी नाका इमामपूर येथे मंजूर होऊन त्या ठिकाणी रेल्वे स्टेशन व रेल्वे ट्रॅक आणि क्वार्टर देखील तयार करण्यात आलेला आहेत मात्र काही पुढारी व भूमाफियांनी रेल्वे स्टेशन पालवन रोडला घेण्याचे षडयंत्र करून स्टेशनची जागा बदलण्यात आली बार्शी नाका स्टेशनला ६० टक्के गायरान जागा उपलब्ध आहे तसेच ज्यांच्या मालकीची जागा जाणार होती त्यांना मावेजाही गेला आहे त्यामुळे अतिशय कमी खर्चात बीडला रेल्वे धावली असते, इमामपूर रोडवरील रेल्वे स्टेशन साठी आठ कोटी २२ लाख रुपये खर्च करून बांधकाम करण्यात आलेले आहे या स्टेशनला हायवे क्रमांक २२२,२२१ तसेच बायपास व बीड ते नेकनूर हे सह फुटाचे रस्ते तयार असल्यामुळे जास्त ट्राफिक देखील होणार नाही या स्टेशन पासून नवीन जुना मोंढा जवळ आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन, पोलिस अधीक्षक कार्यालय, पोलिस मुख्यालय,बस स्टँड, तहसील कार्यालय, कोर्ट, जिल्हा परिषद, नगर परिषद, आठवडी बाजार, मेडिकल



कॉलेज, विविध हॉस्पिटल्स, आडत मार्केट, पंचायत समिती सह महत्त्वाची कार्यालय देखील जवळ आहेत तसेच विविध धार्मिक व पर्यटन स्थळे सुद्धा व्यापाऱ्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठीही बार्शी नाका इमामपूर रोडवरील रेल्वे स्टेशनच सोयीचे आहेत, सोलापूर जळगाव हा रेल्वे मार्ग झाले असून भविष्यात या स्टेशनवर रेल्वेचे मोठे जंक्शन होऊ शकते सध्याचे पालवन येथील नवीन रेल्वे स्टेशन हे सर्व गैरसाईचे आहे त्यामुळे या सर्व गोष्टीच्या विचार करून बार्शी नाका इमामपूर रोड येथे रेल्वे थांबा कण्यात यावे अशी मागणी शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांनी खा. बजरंग सोनवणे आणि आ.संदिप क्षीरसागर यांच्याकडे शिष्टमंडळासह केली आहे यावेळी नगरसेवक संजय उडान, महेश शिंगण,दिपक चौगुले, अमोल अहिरे, जहुर भाई इनामदार,मैनोदिन मोमीन,शोईब इनामदार,नीम सौदागर,लतिफ खान,सैय्यद सलीम,कलीम भाई,सलीम भाई,शेख अजहर,शेख हादी आदी मान्यवर उपस्थित होते



## जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत दीनानाथ बालकाश्रमाचे नेत्रदीपक यश!

बीड (प्रतिनिधी)

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय बीड अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय बाल महोत्सव स्पर्धा दिनांक ९ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत माऊली बालक आश्रम एमआयडीसी बीड येथे संपन्न झाल्या.

यावेळी कबड्डी, कॅरम, बुद्धिबळ, खो-खो, लांब उडी, लिंबू-चमचा, थैलारेस, रांगोळी स्पर्धा, चित्रकला, निबंध आदी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत दिनानाथ बालकाश्रम अंथरवण पिंपरी तांडा ता.जि. बीड येथील विद्यार्थ्यांनी कबड्डी या सांघिक खेळात प्रथम पारितोषिक पटकावले. वैयक्तिक खेळात छोटा गट लिंबू-चमचामध्ये प्रथम क्रमांक चांगन सौरभ सतीश व मोठ्या गटात प्रथम क्रमांक देशमाने गजानन राजाराम या विद्यार्थ्यांनी मिळवला. लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक चव्हाण ज्ञानेश्वर प्रभू याने तर निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मुंडे अभिषेक बाळासाहेब या विद्यार्थ्यांनी मिळवले. इतरही स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बडे, महिला बाल विकास अधिकारी शेख, बालकल्याण समितीचे अध्यक्ष तांगडे, जि.म.बा. कार्यालयाचे परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव व सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड या संस्थेचे सचिव अतुल पवार इत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन चव्हाण बी.एल., अनिल पवार सर यांनी केले. वरील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, सुशील पवार, प्राचार्य खंदारे सर, मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# जागतिक महिला दिनी जगावेगळ आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांचा जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने होणार सन्मान - शेख आयेशा

### आपल्या क्षेत्रात यशस्वी गरुड भरारी घेणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी माहितीसह तात्काळ संपर्क साधावा

बीड (प्रतिनिधी)

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून यावर्षी आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जगा वेगळं आव्हान स्वीकारणाऱ्या ज्या मुली, महिला आहेत त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वच क्षेत्रात ज्या महिलांनी आपल्या परीने यशस्वी होऊन वेगळं पण सिद्ध केल आहे अशा यशस्वी महिलांचा देखील विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी जगावेगळे आव्हान स्वीकारणाऱ्या महिला आणि आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या यशस्वी महिलांनी या पुरस्कारासाठी ७० ३० १४ ९३ २२ यावर तात्काळ संपूर्ण माहितीसह संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने पत्रकार शेख आयेशा यांनी केले आहे.

शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आश्रय सेवा केंद्राच्या वतीने आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात येणार आहे. ज्या ज्या महिलांनी आव्हानात्मक क्षेत्र स्वीकारून त्यामध्ये यशस्वीपणे वाटचाल करत आहेत. अशा जगा वेगळं आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी पात्र असलेल्या जगावेगळे आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांनी सन्मान स्वीकारण्यासाठी आपल्या नावाची नोंदणी १ मार्च २०२५ पर्यंत व्हाट्सअप नंबर ७० ३० १४ ९३ २२ वर आपला संपूर्ण पत्ता, व्यवसाय आणि वेगळं पण फोटोसह पाठवून नोंदणी करावी.



यामध्ये प्रामुख्याने ज्या महिलांनी ड्रायव्हर, चालक, वाहक, जिम ट्रेनर, टपरी चालक, हॉटेल चालक-मालक, सेक्युरिटी गार्ड बॉडीगार्ड पायलट लाईनमन, इलेक्ट्रिशियन यासह वेगळ्या क्षेत्रामध्ये आपलं करिअर जिद्दीने घडवत आहेत अशा मुली आणि महिला या पुरस्कारासाठी पात्र आहेत.

त्याचबरोबर विविध क्षेत्रांतर्गत प्रामुख्याने वैद्यकीय क्षेत्रामध्ये,वकिली क्षेत्रामध्ये, प्रशासकीय सेवेमध्ये, कलाक्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, सांस्कृतिक क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात, इंजिनिअरिंग क्षेत्रात, लोकप्रतिनिधी राजकीय क्षेत्रात, बचत गट सेवाभावी संस्था अंतर्गत, खाजगी ट्युशन क्षेत्रात, शिक्षिका म्हणून, ट्युशन चालक म्हणून, योग प्राणायाम क्षेत्रामध्ये, कलाक्षेत्रात, अध्यात्मामध्ये, खोखो, कुस्ती, स्विमिंग, एकूणच सर्व क्षेत्रांमध्ये पैकी ज्या महिलांनी एखादे क्षेत्र निवडले आणि त्या क्षेत्रामध्ये काहीतरी वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करून यशस्वी भरारी घेतली आहे. अशा यशस्वी मुलींचा महिलांचा देखील मान्यवरांच्या शुभहस्ते येथे सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी पात्र असलेल्या विविध क्षेत्रातील यशस्वी भरारी घेतलेल्या महिलांनी पुरस्कारासाठी आपल्या नावाची नोंद आपल्या कार्यासह संपूर्ण बायोडाटा आणि फोटोसह व्हाट्सअप नंबर ७० ३० १४ ९३ २२ यावर १ मार्च २०२४ पर्यंत करण्यात यावी. जे पुरस्कारासाठी पात्र आहेत त्या नोंदणी झालेल्या सत्कारमूर्तींची नावे २ मार्च रोजी जाहीर करण्यात येतील आणि ८ मार्च रोजी त्या सत्कारमूर्तींचा बीड जिल्ह्यातील मानांकित, प्रतिष्ठित मान्यवरांच्या शुभहस्ते येथे सन्मान करण्यात येईल. त्यामुळे या पुरस्कार सोहळ्यासाठी पात्र असलेल्या सत्कारमूर्ती महिलांनी, मुलींनी आपल्या नावाची नोंद उस्फूर्तपणे तात्काळ करावी असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने पत्रकार शेख आयेशा यांनी केले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# शेख मैनुभाई यांच्या नावाने गुणवंताचा गौरव हा स्तुत्य उपक्रम - ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

## शेख मैनुद्दीन शेख स्मरणार्थ आदर्श पुरस्कार व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ संपन्न
## राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई आमच्या आदर्श – तहसिलदार पाटील

आष्टी (प्रतिनिधी)

आपली प्रत्येक कृती आणि त्या मागचा भाव हा राष्ट्रसमर्पनाचा व राष्ट्रहिताचा असावा. प्रामाणिक, देशाभिमानी, नम्र सेवाभावी आणि सर्हदयी तसेच माणुसकीचे विलोभनीय दर्शन घडत जावे असे सांगत सुसंवाद हा माणुसकीचा धर्म असावा. समाजसेवक शेख मैनुभाई यांच्या नावाने गुणवंताचा गौरव हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन संत मदन महाराज बिहाणी देवस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले.

स्व. शेख मैनुद्दीन यांच्या स्मरणार्थ आदर्श पुरस्कार वितरण आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल आपल्या ओघवत्या शैलीतून विद्यार्थी आणि मान्यवरांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील होत्या.यावेळी रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, कडा ग्रामपंचायतचे सदस्य भाऊसाहेब भोजने, महाराष्ट्र बास्केट बॉल प्रशिक्षक प्रा. डॉ. जमीर शेख, हरिभाऊ जंजिरे, युवराज सरोदे, मनोहर सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते. स्व. मैनुद्दीन शेख स्मरणार्थ आदर्श पुरस्कार वितरण तसेच गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण सोहळा रविवार दि. १२ जानेवारी रोजी जिजाऊ जयंती निमित्त कडा येथील सद्गुरु हॉटेल – हॉल धामणगाव रोड, मदन महाराज मठासमोर पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शेख नजमा यांनी केले. दीप प्रज्वलन आणि प्रतिमापूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल व तहसिलदार वैशाली पाटील यांच्या हस्ते आदर्श पत्रकार म्हणून दैनिक झुंजारनेताचे



उपसंपादक तथा जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, तेजवार्ता न्युज चनलचे संपादक सय्यद बबलूभाई, आज मराठी न्युज चनलचे संपादक अविशांत कुमकर, आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणून श्रीमती उषाताई ढेरे, श्रीमती वैशालीताई झांजे, राजेंद्र लाड, प्रशांत दगडे, सुनिल अनारसे, आदर्श साहित्यिक म्हणून अनंत कराड, आदर्श डॉक्टर म्हणून डा. शेख नदीम (आष्टी), डा. सौ. मंजूषा टेकाडे (कडा), आदर्श सेवक म्हणून पुरस्कार रोकडे शहादेव (मामा) तसेच गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षिका तथा कवयित्री श्रीमती शेख नजमा यांनी केले. तहसीलदार पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. आदर्श पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व कौतुक केले. ह. भ. प. बहिरवाल महाराजांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले. भविष्यातही असेच कार्यक्रम घेण्यात यावे म्हणून शुभेच्छा दिल्या. सोनाजी बनकर सर मुख्याध्यापक वहाली यांनी या राबवलेल्या उपक्रमांचे मोठे वटवृक्ष वृक्ष व्हावे यासाठी शुभेच्छा दिल्या. हरिभाऊ जंजिरे यांनी स्व. शेख मैनुद्दीन यांच्या कार्याचे कौतुक केले. आदर्श शिक्षिका वैशाली झांजे यांनी बापाच्या स्मरणार्थ आदर्श पुरस्कार देणारी पहिली शिक्षिका म्हणून नजमा शेख यांची कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. आदर्श शिक्षक राजेंद्र लाड, दगडे प्रशांत यांनी देखील उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. डॉ. नदीम शेख यांनी स्व. मैनोद्दीन शेख यांच्या कार्याची स्तुती केली. आदर्श शिक्षिका शेख नजमा मॅडमला या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी सिद्धी पांडुरंग मानमोडे, रितेश मनोहर सरोदे, आकांक्षा आजिनाथ बोरा, अश्विनी कुमखाले, जैनब परवेज शेख, चैत्राली भरत गायकवाड या गुणवंत विद्यार्थ्यांचाही स्मृतीचिन्ह, रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, साहित्यिक अनंत कराड, सुनिल अनारसे, वैशाली झांजे, राजेंद्र लाड, डा. नदीम शेख, पत्रकार अविशांत कुमकर, प्रशांत दगडे यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे संचलन संयोजक नजमा शेख यांनी तर आभार समीर शेख यांनी मानले.

# शासकीय कापुस खरेदी पुढील आदेश येईपर्यंत बंद राहिल – सभापती नरवडे

माजलगाव (प्रतिनिधी)

येथील बाजार समिती अंतर्गत असलेल्या शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने तसेच ढगाळ वातावरणामुळे सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत कापुस खरेदी बंद राहणार असल्याने शेतक-यांनी कापुस विक्रीस आणु नये,असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे. येथील बाजार समिती अंतर्गत मनकॉट जिनिंग,पुर्वा जिनिंग,कुणाल जिनिंग, कॉटसिट जिनिंग,एच.जे. कॉटन,महाराष्ट्र जिनिंग पात्रुड याठिकाणी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर सिसीआय कडुन कापसाची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेली



आहे. त्यामुळे जिनिंगमध्ये कापुस ठेवण्यास जागा उपलब्ध नाही व वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांचे नुकसान होउ नये याकरीता शेतकरी बांधवांनी दि.१२ जानेवारी पासुन ते सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत शासकीय कापुस खरेदी बंद राहिल,याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी. तसेच पुढील आदेश येईपर्यंत शासकीय खरेदी केंद्रावर शेतकरी बांधवांनी कापुस विक्रीस आणु नये,असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) प्रथम

## शाळेला मिळाले तीन लाखाचे पारितोषिक,केज तालुक्यातुन पटकावला प्रथम क्रमांक

केज/प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ मध्ये केज तालुक्यातून सारणी (सांगवी) येथिल श्रीविठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला असून शाळेला तीन लाखांचे पारितोषिक मिळाले आहे.महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ ची केज तालुकास्तरीय स्पर्धा नूकतीच तहसिलदार,गटविकास अधिकारी,गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वात पार पडली.स्पर्धेत शाळेतील भौतिकसुविधा, विद्यार्थी गुणवत्ता,शाळे तील स्वच्छता आदी बाबींना धरून शाळेची निवड करण्यात येते. तालुकास्तरीय झालेल्या स्पर्धेत सारणी (सांगवी) येथिल श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक



पटकवला आसून शाळेला तीन लाखांचे पारितोषिक मिळाले आहे.दरम्यान गटशिक्षणाधिकारी लक्ष्मणराव बेडसकर,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिलरावकेंद्रे,जेष्ठशिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे,केंद्रप्रमुख आयु.धम्मदीपा दरबारे मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) या शाळेने केज तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला असून शाळेने तीन लाखरुपयांचे पारितोषिक पटकावले आहे.शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे,संस्थेचे अध्यक्ष विजयकांत मुंडे,सचिव अतुल मुंडे,प्राचार्या माधुरी मुंडे मॅडम सर्व खातेप्रमुख यांनी प्राचार्य सचिन हांगे सर,पर्यवेक्षक उद्धव मुरकुटे सर,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संपूर्ण स्टाफ यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



# उप प्रादेशीक परिवहन कार्यालयात रस्ता सुरक्षा परवाह अंतर्गत रक्तदान आणि आरोग्य तपासणी संपन्न

अंबाजोगाई/ प्रतिनिधी

दि.१० जानेवारी २०२४ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई येथे रस्ता सुरक्षा परवाह अंर्तगत रक्तदान शिबीर घेण्यात आले.याशिवाय याच कार्यक्रमात मोफत आरोग्य तपासणी,नेत्र तपासणी सुध्दा करण्यात आली.याचा लाभ कार्यालयामध्ये बाहेरून आलेले वाहक,वाहन लायसन्स धारक नव्याने कार्यालयीन कामांसाठीआलेले नागरिक यांची मोठया संख्येने उपस्थित होती.या कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक श्री.आचार्य साहेब,श्री. करांडे साहेब,श्री.कांबळे साहेब,श्री.रंगवाड साहेब, कर्मचारी,चालक मालक संघटनेचे प्रतिनिधी आदीं नी सहभाग घेतला.



# प्रा.शेषराव नागरे यांना पितृशोक

शिरूर कासार ।प्रतिनिधी

ब्रह्मनाथ येळंब ता.शिरूर (का).जि.बीड येथील रहिवासी जि.प.शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक भुजंगराव बाबुराव नागरे यांना दि १०/०१/२०२५ रोजी सकाळी ९:३० वा. वयाच्या ८२ व्या वर्षी बीड येथील निवासस्थानी देवाज्ञा झाली.त्यांच्या पश्चात प्रा.शेषराव नागरे,डॉ.केशव नागरे,दोन मुली,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.त्यांचा दशक्रिया विधी १९/०१/२०२५ रोजी रविवारी सकाळी ९:०० वा. सिद्धेश्वर संस्थान,शिरूर कासार येथे होईल.

# प्रणिता गंगाखेडकर यांना आदर्श प्रशासकीय अधिकारी पुरस्कार

बीड :प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदाच्या जयंती निमित्ताने रविवारी मातृभूमी प्रतिष्ठान'तर्फे प्रणिता गंगाखेडकर यांना राज्यस्तरीय आदर्श प्रशासकीय अधिकारी पुरस्कार देण्यात आला. गेल्या १७ वर्षापासून विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा व गुणवत्तेचा संबंधित व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा अर्ज न मागवता निरीक्षणातून आदर्श गुणवंत पुरस्कार दिला जातो. अखंडपणे मातृभूमीच्या सेवेसाठी गुणवंतांना प्रेरणा देण्याचे कार्य मातृभूमी प्रतिष्ठान सातत्याने करत आहे.

यावर्षी शोध निर्मूलनाचा हे भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी सादर केलेल्या दोन अंकी नाटिकेमार्फत जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक वृंद सामाजिक कार्य करत आहेत.जिल्हा परिषदेच्या शाळांमधून ज्ञानार्जनांचं काम करणाऱ्या शिक्षकांनी शाळेच्या वेळेच्या व्यतिरिक्त वेळ देऊन ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर आणि नाट्य क्षेत्रातील मार्गदर्शक प्रा. केशव भागवत बलभीम महाविद्यालय, बीड यांच्या नाट्य शिक्षण प्रशिक्षणामार्फत जिल्हा परिषद शिक्षक नाट्य क्षेत्राकडे वळलेले आहेत. यात शोध निर्मुलनाचा हे नाटक दत्ता बनकर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बऱ्हाणपूर, केंद्र खांडेपारगाव यांनी लिहिलेले असून नेपथ्य, वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा आणि नाटकातील पात्रात जीव ओतून भूमिका साकारणारे बहुतांशी जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकवृंद आहेत. या नाटकातून एकच संदेश समाजाला देण्यात येतो की, भ्रष्टाचारामुळे देशाची, समाजाची प्रगती ही केवळ कागदापूर्ती मर्यादित राहिली असून ते आपल्यासाठी घातक आहे त्यामुळे भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत. यासाठी



सर्वच स्तरातुन प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहेत. जेव्हा प्रत्येक व्यक्ती प्रत्येक अधिकारी प्रत्येक लोकप्रतिनिधी हा खऱ्या अर्थाने स्वार्थापासून परावृत्त होऊन देशासाठी काम करण्यासाठी तयार होईल तेव्हाच आर्थिक सुबत्ता वैचारिक सुबत्ता येईल यात शंकाच नाही.

मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात शोध निर्मूलनाच्या टीममधील सर्व कलाकारांना प्रशस्तीपत्र आणि टीम साठी चषक प्रदान करण्यात आला. या नाटकाचा कामानिमित्ताने जिल्हा परिषद शिक्षकांचा सत्कारासमवेतच हे कार्य घडवून आणण्यासाठी मोलाची कामगिरी बजावणाऱ्या श्रीमती प्रणिता केशवराव गंगाखेडकर ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दिग्दर्शनाचे काम केलेले आहे. त्यांना मातृभूमी राज्यस्तरीय आदर्श प्रशासकीय अधिकारी पुरस्कार महंत राधाताई सानप महाराज यांच्या हस्ते देण्यात आला.



# राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती पाटोदा नगरपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा (प्रतिनिधी)

हिंदवी स्वराज्य साकारण्यासाठी शर्थीने प्रयत्न करणाऱ्या राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व तरुणांसाठी प्रेरणास्तोत्र आध्यात्मिक जीवनाचा उद्देश फक्त आध्यात्मिकता नव्हे,तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन आणणे आसुन 'तुम्ही जे ठरवाल ते बनू शकता' ह्या विश्वासाने तरुण पिढीला आपले ध्येय साध्य करण्याची प्रेरणा देणारे स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त पाटोदा नगरपंचायत कार्यालयांमध्ये युवानेते सागर धस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अजरामर स्मृतीस विनम्र अभिवादन केले. जगालाही हेवा वाटेल,असे रयतेचे राज्य घडविणाऱ्या आणि स्वराज्याची ज्योत चेतवणाऱ्या, माँसाहेब जिजाऊ यांनी शेतकरी, कष्टकरी जनतेला पाठबळ देऊन स्वराज्याच्या रूपाने सुशासन प्रस्थापित करण्याचे महानकार्य केलेजगातील महापराक्रमी आणि आदर्श छत्रपती घडवणारी आदर्श माता राजमाता जिजाऊ व तरुण पिढीला आपले ध्येय साध्य करण्याची प्रेरणा देणारे स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त कोटी कोटी वंदन करताना युवानेते सागर धस, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, नगरसेवक संतोष दादा जाधव, सभापती रामेश्वर गोरे,सुनील वाघमारे,युवानेते भैय्यासाहेब घुमरे, जाधव सर,पत्रकार गणेश शेवाळे, राज खवळे,बापु शेवाळे,संदीप नाईकनवरे,जयप्रकाश घुमरे यांच्यासह पाटोदा नगरपंचायतचे सर्व कर्मचारी व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# चिंचवन येथे आज मकरध्वज जन्मोत्सव सोहळा
# मकरध्वजाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येणार

वडवणी (प्रतिनिधी)

**भारत देशात हनुमान पुत्र म्हणून ओळखले जाणारे मकरध्वजाचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळ चिंचवन येथे आहे. रामायण काळात मंकावती नगरी हीच आजचे चिंचवण आहे. याच ठिकाणी राम लक्ष्मणाला बंदिस्त करून ठेवले होते .आणि याच ठिकाणावरून मकरध्वज व हनुमंताचे युद्ध होऊन हनुमंताने त्यांची सोडवणूक केलीहोती. रामायण काळातील या ठिकाणीच भव्य दिव्य मकरध्वज जन्मोत्सव सोहळा दरवर्षी साजरा होतो. आज या सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. चिंचवन येथील या सोहळ्यात आतापर्यंत महाराष्ट्र राज्यातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तने झाले आहेत.**गावातील सर्व नागरिक मोठ्या उत्साहात या सोहळ्यामध्ये सहभागी झाले आहेत . पंगतीत मोठ्या प्रमाणात अन्नदान झाले आहे. या सोहळ्यात आतापर्यंत या महाराजांची कीर्तने झाले आहेत. हा सोहळा सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे यशस्वीपणे पार पडत आहे. आज सकाळी दिवस सूर्योदय वेळी मकरध्वज जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. यावेळी फुले उधळून हरिनामाच्या गजरात या सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती लाभणार आहे रामानाचार्य अर्जुन महाराज लाड यांच्या कीर्तनानंतर दुपारी महाप्रसाद होऊन या सोहळ्याची सांगता होणार आहे .सर्व जाती



धर्मातील लोकांना सोबत घेऊन जाणारा हा सोहळा चिंचवन आणि परिसरातील लोकांना प्रेरणादायी ठरत आहे.

### प्रवचनकारांची नावे

दिनांक ६ ते १२ जानेवारी या कालावधीत दररोज दुपारी चार ते पाच या वेळेत अनुक्रमे ह भ प ज्ञानोबा माऊली, ह भ प हरिदास महाराज सोळंके गुरुजी मोहखेड, ह भ प लक्ष्मण महाराज बांगर कचरवाडी, ह भ प सुनील महाराज अंडील पहाडी पारगावकर, ह भ प शंकर महाराज शिंदे साबळेकर सेवानिवृत्त फौजदार, ह भ प आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांत नगर, ह भ प रामेश्वर महाराज धपाटे परडी माटेगाव बीड जिल्हाध्यक्ष वारकरी साहित्य परिषद यांचे झाले आहेत.

या महाराजांचे झाले कीर्तने

मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्यात दिनांक ६ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान रात्री आठ ते दहा या वेळेत ६ रोजी जेऊर येथील ह. भ. प. अक्षय महाराज उगले, ७ रोजी तुकोबाराय पावन धाम संस्था संभाजीनगर येथील ह. भ. प. महादेव महाराज बोराडे शास्त्री ८ रोजी परळी येथील हभप भरत महाराज जोगी ९ रोजी परळी येथील हभप तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, १० रोजी टाकळी येथील ह भ प केशवराव महाराज घुले शास्त्री, ११ रोजी नाशिक येथील हभप अनिल महाराज तुपे, १२ रोजी सिद्धेश्वर महाराज संस्थान शिरूर कासार येथील ह भ प विवेकानंद महाराज शास्त्री तसेच आज १३ जानेवारी रोजी पौष्य पौर्णिमेनिमित्त या सप्ताहाचे काल्याचे किर्तन सकाळी अकरा वाजता महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड यांचे होईल. दिनांक १४ जानेवारी रोजी संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत राज्यातील नामवंत कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज कोठुळे यांचे कीर्तन व त्यानंतर नंदकिशोर बाबासाहेब बडे पाटील व श्रीमंत संतराम बडे, पुरुषोत्तम भागवत तांबडे यांच्यातर्फे महाप्रसाद होणार आहे.

---

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

केज / प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगाव ता. केज.जि.बीड येथे दिनांक १२ जानेवारी २०२५रोजी राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्याप्रतिमेला मान्यवरांच्या हस्तेपुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त ग्रामसेवक एस.पी.गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, विक्रम गायकवाड, प्रथमेश गायकवाड,रोहन गायकवाड,शिवम गायकवाड,सोहम गायकवाड अथर्व गायकवाड यांची उपस्थिती होती.या




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, व्याख्याते,ख्यातनाम वक्ते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांचे जीवन कार्य संपूर्ण विश्वासाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## पौष पौर्णिमेनिमित्त चौंडेश्वरी मातेचा मिरवणूक सोहळा ; महाप्रसादाचे आयोजन

### भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा

वडवणी (प्रतिनिधी)

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक असलेल्या कापड तयार करणारा कोष्टी समाजाची कुलस्वामिनी माता चौंडेश्वरी मातेचा पौष पौर्णिमेनिमित्त मोठा उत्सव सबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वडवणी येथे बहुसंख्य असलेल्या कोष्टी समाजाच्या वतीने प्रतिवर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करून हा सोहळा साजरा करण्यात येतो. या सोहळ्यासाठी वडवणी तालुक्याच्या बाहेरून देखील भाविक भक्त येत असतात. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तन मंडळींचे दररोज कीर्तन होत आहे.



उत्सवाच्या शेवटच्या दिवशी आज माता चौंडेश्वरीची शोभायात्रा सकाळी ८:०० ते १०:०० काढण्यात येणार आहे. त्यानंतर १०:०० ते १२:०० रामायणाचार्य ह. भ. प. नामदेव महाराज लबडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. किर्तन झाल्यानंतर चौंडेश्वरी मंगल कार्यालय, श्रीराम मंदिर चौक वडवणी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी या शोभायात्रेमध्ये सहभागी होऊन या सोहळ्याचा आनंद घ्यावा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन उत्सव समिती व कोष्टी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## सरपंच अभिमन्यू क्षीरसागरांचा अपघाती मृत्यू

बीड /प्रतिनिधी

राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परच्या धडकेत बीडमध्ये पुन्हा एकदा एका सरपंचाला आपला जीव गमवावा लागला आहे. परळी तालुक्यातील सौंदनाचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा अपघातातध्ये मृत्यू झाला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील मिरवट फाट्यावर शनिवारी (काल) रात्री हा अपघात झाल्याची माहिती आहे. राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीवरील सरपंचाला उडवले. यात अभिमन्यू क्षीरसागर यांचा मृत्यू झाला

टिप्पर चालकाने काढला पळ

सैंदाना गावाचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांना राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने उडवले, त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. टिप्पर चालकाने अपघातस्थळावरून पळ काढल्याचे स्थानिकांनी सांगितलेय. या अपघातानंतर बीडमधील राखेचे अर्थकरण चर्चेत आले आहे. हा अपघात आहे की घातपात याचा आता पोलीस तपास करत आहेत. या घटनेनंतर परळीतील राखेचे अर्थकारण पुन्हा चर्चेत आले आहे. या परिसरातील ८ ते ९ गावांना प्रदूषणाचा फटका बसला आहे. शेतातील पिकांसह ओढ्यातील पाणी सुद्धा राखमय झाले आहे. त्याविरोधात काही सरपंचांनी विरोध केला होता.

..तरीही राखेचे टिप्पर बंद नाहीत- धस

परळीत तालुक्यात राखेची वाहतूक करणाऱ्या एका टिप्परने सरपंचाला चिरडल्याची घटना घडली आहे. या घटनेवर भाजप आमदार सुरेश धस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. चोंढवाना गावच्या सरपंचाचा खात्मा करण्यात आला आहे, असा दावा त्यांनी केला. परंतु हा घातपात आहे की अपघात आहे,



शेतातून घरी जाताना राख वाहतूक करणाऱ्या टिप्परने उडवले

हे अजून सिद्ध झाले नाही, त्याचा तपास करावा, असेही सुरेश धस म्हणाले. महाराष्ट्रात परळीची भयानक चर्चा सुरू असून देखील राखेचे टिप्पर बंद नाहीत. आजही राखेच्या टिप्परची अवैध वाहतूक सुरू आहे. या सर्व प्रकाराला परळीचे पोलिस आणि थर्मल पावरचे अधिकारी, कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोपी भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.

## हार्वेस्टर अनुदान घोटाळ्यात दोन्ही आका सहभागी

चोंढवाना गावच्या सरपंचाचा खात्मा करण्यात आला आहे, असा दावा त्यांनी केला. परंतु हा घातपात आहे की अपघात आहे, हे अजून सिद्ध झाले नाही, त्याचा तपास करावा, असेही सुरेश धस म्हणाले. तसेच हार्वेस्टर मशीन घोटाळ्यात दोन्ही आका सहभागी असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. शेतकऱ्यांची फसणवूक केली असून पैसे परत मागणाऱ्या शेतककऱ्यांना मारहाण करण्यात आली, असेही ते म्हणाले.

परळीत तालुक्यात राखेची वाहतूक करणाऱ्या एका टिप्परने सरपंचाला





चिरडल्याची घटना घडली आहे. या घटनेवर भाजप आमदार सुरेश धस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. यासोबतच त्यांनी हार्वेस्टिंग मशीन अनुदान फसवणूक प्रकरणावर भाष्य करत धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यावर हल्ला चढवला.

### इतर जिल्ह्यांतूनही हा घोटाळा समोर येईल

वाल्मीक कराडने ऊसतोडणी यंत्रासाठी अनेकांकडून पैसे घेतलेत. १४१ शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीन द्यायच्या होत्या. या लोकांनी २ ते ५ हजार लोकांकडून प्रत्येकी ८ लाख रुपये जमा केले. परंतु केवळ १४१ शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीन दिल्या. या प्रकरणात पंढरपूर तालुक्यात पहिला गुन्हा दाखल झाला. अशाप्रकारचे गुन्हे आता कोल्हापूर, पुणे बीडमध्ये दाखल होतील, असा दावा सुरेश धस यांनी केला. अनेक लोकांकडून ८ लाख रुपये घेतले असून पैसे घेतले यासाठी पुराव्याची गरज नाही, कारण मीडियासमोर ते पुरावे दिलेले आहेत, असे सुरेश धस म्हणाले.

---




आज गुरुवर्य भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी माजी उपनगराध्यक्ष व भा ज प जिल्हा सरचिटणीस ड सर्जेराव तांदळे यांनी जिजाऊ व स्वामीजींच्या प्रतिमेत पुष्पहार अर्पण करूनअभिवादन केले.यावेळी वाचनालयाचे संस्थापक डॉ राजेंद्र सानप,अमर सानप,एम डी पांचाळ,आर के भोंडवे, सुनील गायकवाड,धनंजय सानप,एच आर सानपआदिंसह असंख्य वाचक उपस्थित होते

## उपजिल्हा रुग्णालय येथे वाचादोष शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

बीड - जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ शेख रौफ, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अभय गोंदीकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शून्य ते अठरा वर्ष वर्ष वयोगटातील ५८बालकांची वाचादोष शस्त्रक्रिया (टंग टाय सर्जरी) शिबिर पार पडली.यावेळी जनरल सर्जन डॉ.अभिषेक जाधव यांनी शस्त्रक्रिया केली. त्यासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.भुलतज्ञ श्रीमती डॉ.चौरे,बालरोग तज्ञ डॉ.रउफ, अधिपरिचारिका नूतन कोल्हे, आरोग्य निरीक्षक कुलकर्णी, श्री.नाजरे आदींनी मदत केली. शस्त्रक्रियेमुळे मुलांचा वाचादोष तसेच बोलण्यातील बोबडेपणा दूर होणार आहे.

शस्त्रक्रिया केल्यामुळे पालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक रमेश तांगडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.आंधळे डॉ.मिसाळ डॉ.शेख सिराज डॉ. अरबड डॉ. जाधव डॉ.तिडके डॉ. अंकुश डॉ.पवार डॉ.सबा तसेच औषध निर्माण अधिकारी सय्यद वसीम, प्रवीण जाधव,अमोल झिरमिटे, स्वाती करांडे,आसेफ सय्यद तसेच आरोग्य सेविका रंजना वसावे, नीलम वळवी, डोंगर लालाबाई, अर्चना गवळी, नीता शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

